सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ-तक्रार क्र. बीएम- २१/२०२०**

**तक्रारकर्ता श्री. ॲड. कपील सोनी**
5, Ramnath Mishra Compound, Yashwant Tawde Road,
Dahisar (East), Mumbai- 400 068.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (इवका) आर/मध्य,**
महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त,आर/मध्य विभाग यांचे कार्यालय,
पहिला मजला, टी. पी. एस.१, चंदावकर रोड, बोरीवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त,आर/मध्य विभाग यांचे कार्यालय,
पहिला मजला, टी. पी. एस.१, चंदावकर रोड, बोरीवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९२.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २५.०२.२०२०**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु.मा.आ. बो.क्र. ३८७४/२०१८ रा.मा.आ. अपील क्र.१६०६/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. ३१.१२.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*१) "अपिलार्थी यांनी दाखल केलेले व्दितीय अपील अर्ज कलम (१८) अंतर्गत तक्रार म्हणून दाखल करण्यात येत आहेत.*

*२) सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०५.०२.२०२० रोजी दुपारी ३.०० वाजता घेण्यात येईल."*

उक्त आदेशानुषंगाने अपिलार्थी यांचा द्वितीय अपील अर्ज तक्रार क्र. २१/२०२० मध्ये दाखल करण्यात आला असून सदर तक्रार अर्जावर दि. ०५.०२.२०२० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. परंतु दि.०५.०२.२०२० रोजीची सुनावणी तहकुब करण्यात आली असुन ती आज दि.२५.०२.२०२० रोजी आयोजित करण्यात आली आहे.

सुनावणीवेळी तक्रारकर्ता यांनी असे विशद केले की, जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य नाही, कारण या प्रकरणी इमारत व कारखाने व इमारत प्रस्ताव या कार्यालयामध्ये पत्रव्यवहार झाले आहे व नोटीसही निर्गमित करण्यात आले आहे.

जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा खुलासा १५ दिवसात सादर करावा. त्यांचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर कार्यालयाने योग्य ती कार्यवाही करावी.

State Information Commission ★ Greater Mumbai ★

**मुंबई**
**दिनांक : २५.०२.२०२०**

**(सुनील पोरवाल)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**रामाआ तक्रार क्र. बीएम- २१/२०२०**
**तक्रारकर्ता श्री. ॲड कपील सोनी**
**सुनावणी दिनांक : ३०.०६.२०२५ (In continuation of order dt २५.०२.२०२०)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित(व्ही.सी.व्दारे) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा खुलासा १५ दिवसांत सादर करावा. त्यांचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर कार्यालयाने योग्य ती कार्यवाही करावी असे आयोगाने आदेशित केले होते.

श्री. भुपेश बोरे, विद्यमान इमारत मुकादम (बीट क्र. १०), श्री. गणेश सातपुते, विद्यमान कनिष्ठ अभियंता (बीट क्र. १०), श्री. सुनिल साळवे, तत्कालिन इमारत मुकादम (बीट क्र. १०), श्री. नितीन शिंदे तत्कालिन दुय्यम अभियंता (बीट क्र. १०), श्री. पद्माकर चव्हाण, तत्कालिन जन माहिती अधिकारी (बीट क्र. १०), श्री. राजेश मेराई, विद्यमान जन माहिती अधिकारी (बीट क्र. १०) यांनी आयोगास त्यांचे लेखी निवेदन दिलेले आहे. त्यामध्ये पुढीलप्रमाणे नमुद केलेले आहे:-

*"अपिलकर्ता, श्री. कपिल सोनी यांचा माहितीचा अधिकार अंतर्गत अर्ज दि. १२.०४.२०१८ रोजी या कार्यालयात प्राप्त झाला होता. त्यास अनुसरुन या कार्यालयाने सदर बाबतीत माहिती उपलब्ध नसल्याने "There is no information available with this office" असे माहिती नसल्याबाबतचे उत्तर अर्जदार, श्री. कपिल सोनी यांना या कार्यालयामार्फत पत्र क्र. AC/R/C/१९४६/BF dated ११.०५.२०१८ अन्वये कळविण्यात आले होते. तथापि, प्रथम अपिलाच्या सुनावणीचे आदेशात अनावधनाने "PIO has replied within stipulated time period informing that there is information available on record. Hence, there is no orders to PIO" असे लिहिले गेले. तथापि, मा. राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई यांचे निर्देशानुसार अपिलकर्ता यांना या कार्यालयामार्फत हवी असलेली कागदपत्रे या कार्यालयातील अभिलेखामध्ये उपलब्ध नाहीत असे आम्ही खात्रीपूर्वक लिहून देत आहोत."*

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता (व्ही.सी.माध्यमाव्दारे) उपस्थित असून त्यांच्या निदर्शनास आणले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.१०.२०१८ च्या प्रथम अपील आदेशामध्ये *"PIO has replied within stipulated time period informing that there is information available on record. Hence, there is no orders to PIO"* असे स्पष्ट नमुद केले आहे. म्हणजेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही विशिष्ट प्रकारचे आदेश जन माहिती अधिकारी यांना दिलेले नाहीत.

या तक्रारीसंदर्भातील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्त्यांच्या दि. १२.०४.२०१८ च्या माहिती अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. ११.०५.२०१८ रोजी दिलेले उत्तर स्पयंस्पष्ट असून प्रथम अपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांच्या आदेशात माहिती देण्याबाबत कोणतेही निर्देश दिलेले नाहीत.

..२/-

तसेच या प्रकरणात तक्रारकर्ता यांच्या म्हणण्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य नाही. कारण या प्रकरणी इ. व का. व इमारत प्रस्ताव या कार्यालयामध्ये पत्रव्यवहार झाले आहे व नोटीसही निर्गमित करण्यात आली आहे. परंतु, त्यांच्या सदर म्हणण्याच्या समर्थनार्थ कोणतेही सबळ पुरावादर्शक कागदपत्रे सादर केली नाहीत. त्यामुळे सदर तक्रारीत कोणतेही तथ्य/ वाजवी कारण असल्याचे दिसून येत नाही. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission ★ Greater Mumbai ★

प्रदीप व्यास
30-6-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ३०.०६.२०२५**